मुद्रा यशोगाथा

नाव :- श्री. नारायण किसना पुजारी, अलिबाग, जि.रायगड

व्यवसाय :- स्नॅक्स व जेवणाचा व्यवसाय

लाभार्थ्याची माहिती :-

प्रधानमंत्री मुद्रा योजनेतील नारायण किसना पुजारी हे एक अलिबाग येथील लाभधारक आहेत.त्यांनी मुद्रा कार्ड योजनेंतर्गत बँक ऑफ इंडिया शाखा अलिबागकडून १० हजार रुपयांचे कर्ज घेतले. त्यांची पूर्वी वडा पाव व स्नॅक्सची हातगाडी होती. आज त्यांनी हातगाडीच्या ऐवजी टपरी सुरु केली आहे. यामध्ये ते स्नॅक्स बरोबर त्यांनी आपल्या ग्राहकांसाठी जेवणाची सोय सुध्दा सुरु केली आहे. लोकांचाही त्यांना प्रतिसाद मिळत आहे. नारायण पुजारी हे मूळचे कर्नाटक मंगळूर येथील आहेत.

वीस वर्षापूर्वी ते अलिबाग येथे आले. सुरुवातीला त्यांनी हॉटेलमध्ये काम केले. हॉटेलमध्ये काम करताना आपल्यालाही काही उद्योग करता यावा. व स्वत:चा व्यवसाय असावा असे त्यांना वाटत असे. या त्यांच्या इच्छेमुळेच त्यांनी काही वर्षांनी स्वत:ची वडापावची हातगाडी सुरु केली. हा त्यांचा व्यवसाय सुरु असताना देशपातळीवर प्रधानमंत्री मुद्रा कार्ड योजना सुरु झाली. आणि मग नारायणने या योजनेंतर्गत मुद्राकार्ड घेतले. त्यातून रुपये १० हजारचे कर्ज घेऊन त्यांनी आपल्या वडापावच्या गाडीऐवजी छोटीशी एक टपरी उभी करुन वडापाव सोबत जेवणाची सुविधा सुरु केली.

महत्वाचे म्हणजे नारायणने घेतलेले कर्ज ही फेडले. व्यवसायवाढीसाठी आणखी कर्ज घेण्याची त्यांची तयारी आहे. यासंदर्भात बोलताना नारायण पुजारी म्हणाले, मुद्राकार्ड योजना एकदम चांगली योजना आहे. आमच्या सारख्या छोटया माणसावर विश्वास ठेवून आम्हाला कर्ज मिळते. जामिनदाराची गरज नाही. बँकेने टाकलेल्या आमच्यावरील विश्वासास मी तडा जाऊ दिला नाही. नियमित कर्ज फेडले. मुद्रा कार्डच्या कर्ज योजनेमुळे माझ्या कौटुंबिक जीवनातही आशादायी चित्र निर्माण झाले आहे. मुलांना चांगल्या शाळेत शिक्षण घेण्यासाठी दाखल केले आहे. अशा शब्दात नारायणने आपल्या भावना व्यक्त केल्या.

----------------